# उद्यान विद्या विभाग
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
## फळे व भाजीपाला प्रक्रिया पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम

.............................................................................................

जा. क्र./उविवि/फ.प्र.के/२८० /२०१३ दिनांक:२१.०५.२०१३

भारत सरकार पुरस्कृत राष्ट्रीय फलोत्पादन अभियांनाअंतर्गत एक वर्ष कालावधीचा **'फळे व भाजीपाला प्रक्रिया पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम'** उद्यान विद्या विभाग डॉ. पंदेकृवि., अकोला येथे जून — २०१३ पासून सुरू करण्यात येणार आहे. त्याकरीता एकुण २५ प्रशिक्षणार्थीची निवड करण्यात येईल. **निवड झालेल्या प्रशिक्षणार्थीना नियमानुसार १५००/— प्रति माह विद्यावेतन दिले जाईल**. सदर अभ्यासक्रमाला प्रवेशासाठी प्रशिक्षणार्थीनी खालीलप्रमाणे पात्रता पुर्ण करणे आवश्यक आहे.

१. प्रशिक्षणार्थी अभ्यासक्रमाला अर्ज करतांना कोणत्याही शाखेचा १२ वी उत्तीर्ण असावा व त्यासाठी कमीत कमी ४० टक्के गुण असणे आवश्यक आहे.
२. प्रशिक्षणार्थीला प्रक्रिया व फलोत्पादन क्षेत्रात अभिरूची असावी.
३. प्रशिक्षणार्थीचे वय — १८ ते ३५ वर्ष असावे.
४. निवड झालेल्या प्रशिक्षणार्थीसाठी वसतीगृहाची व्यवस्था नाही.
५. प्रवेश अर्जासोबत प्रशिक्षणार्थीनी खालील नमुद केलेल्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रती प्रमाणित करून जोडाव्यात.

अ) १२ वी पास बाबतचे गुणपत्रक, प्रमाणपत्र (कमीत कमी ४० टक्के गुण)
ब) शाळा सोडल्याचा दाखला (जन्मतारखेची नोंद असणे आवश्यक)
क) उमेदवार मागासवर्गीय असल्यास तसा विहीत नमुन्यातील सक्षम अधिका—याचा दाखला जोडणे आवश्यक.
ड) प्रवेश घेतांना मुळ कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे.
इ) प्रशिक्षणार्थिनी प्रवेश घेतांना इतरत्र कोणत्याही संस्थेस वा तत्सम प्रशिक्षणाकरीता प्रवेश घेतलेला नसावा. त्याबाबतचे हमीपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
ई) प्रवेश अर्ज पोस्टाने पाठविले जाणार नाही तसेच दिलेल्या तारखेनंतर येणारे अर्ज स्वीकारले जाणार नाही.

प्रवेश अर्ज उद्यान विद्या विभाग, डॉ. पंदेकृवि., अकोला येथे रू. ५०/— (रू. पन्नास फक्त) रोखीने भरून दि. २३/०५/२०१३ पासून फक्त सकाळी १०.०० ते ०५.३० या कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. विहीत नमुन्यात अर्ज भरून वर नमुद केलेल्या प्रमाणपत्राच्या प्रमाणित सत्यप्रतिसह विभाग प्रमुख, उद्यान विद्या विभाग डॉ. पंदेकृवि., अकोला या पत्यावर स्वत: सादर करावा किंवा पोस्टाने पाठवावा. जाहीरात विद्यापीठाच्या सकेत स्थळावर www.pdkv.ac.in सुध्दा उपलब्ध आहे.

अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख ०८/०६/२०१३ दुपारी ३ वाजेपर्यत राहील. त्यानंतर आलेल्या अर्जाचा कुठल्याही स्तरावर विचार केला जाणार नाही.

प्रशिक्षणार्थींच्या निवडीसाठी १०० गुणाची वस्तुनिष्ठ (objective) मराठीतून सामान्यज्ञान व कृषी विषयावर आधारीत लेखी परीक्षा दि.१६/०६/२०१३ वेळ सकाळी १० ते १२ या वेळेत उद्यान विद्या विभाग डॉ. पंदेकृवि., अकोला येथे घेण्यात येईल. व परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थीची मेरिटप्रमाणे निवड केली जाईल व अंतिम निवड यादी विभाग प्रमुख, उद्यान विद्या विभाग यांच्या कार्यालयात दि. १८/०६/२०१३ रोजी लावण्यात येईल. प्रशिक्षणार्थीची निवड करतांना नियमानुसार आरक्षण देण्यात येईल. प्रवेश देण्यात आलेल्या प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधी संपल्याशिवाय मध्येच सोडून जाणार नाही याबाबतचे प्रतिज्ञापत्र ५० रू. च्या स्टॅम्पपेपरवर दोन जामीनदारासह सादर करणे प्रशिक्षणार्थींना बंधनकारक राहील. प्रवेश घेतांना आवश्यक प्रमाणपत्राच्या मुळ प्रती सादर करणे आवश्यक राहील. सदर प्रमाणपत्रे प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतरच परत करण्यात येईल. वरील कार्यक्रमात काही बदल झाल्यास तसेच प्रवेश प्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार निवड समितीस राहतील.

विभाग प्रमुख
उद्यान विद्या विभाग
डॉ. पंदेकृवि., अकोला.